पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

**मा.शहर सुधारणा समिती ( विशेष सभा )**

कार्यपत्रिका क्रमांक - १

**सभावृत्तांत**

दिनांक - **१४/०६/२०१९** वेळ - दुपारी **११.३०** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समितीची पहिली सभा (विशेष सभा) शुक्रवार दिनांक **१४/०६/२०१९** रोजी दुपारी **११.३०** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस **मा.श्रीम.रुबल अग्रवाल, (भा.प्र.से.)**, पिठासीन प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, महानगरपालिका, पुणे व खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
२. मा.सुनिता हेमंत तापकीर
३. मा.कैलास ऊर्फ बाबा भालचंद्र बारणे

या शिवाय मा.लोणकर – सहा. आयुक्त, मा.झगडे - सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**मा.पिठासीन प्राधिकारी तथा अति.आयुक्त, महानगरपालिका पुणे** – सन्मा.सदस्य, उपस्थित सर्व अधिकारी यांचे स्वागत करते. आजच्या विशेष सभेत मा.शहर सुधारणा समितीचे सभापती पदावर नेमणूक करणेचा विषय आहे. त्यासाठीमा.विभागीय आयुक्त यांनी सभेची पिठासीन प्राधिकारी म्हणून माझी या ठिकाणी नेमणुक केलेली आहे.

मुक्त व निर्भयपणे मा.शहर सुधारणा समितीच्या **सभापती** पदाची निवडणुक पार पाडण्यासाठी कामकाजाची लेखी नोंद घेण्याबरोबरच त्या कामकाजाची व्हिडिओ चित्रणाद्वारे देखील नोंद घेण्याची व्यवस्था ठेवणेत आलेली आहे.

**मी नगरसचिव यांना सभेचे कामकाज सुरु करण्याचे आदेश देते.**

**मा.नगरसचिव -** मा.शहर सुधारणा समितीचे **सभापती** पदावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम चे कलम ३० (३) नुसार नेमणूक करणे.

मा.शहर सुधारणा समिती **सभापती** पदाकरीता **मा.लांडगे राजेंद्र किसनराव** यांचे मुदतीत दाखल झालेले एक नामनिर्देशनपत्र मा.पिठासीन प्राधिकारी यांचेकडे छाननी करणेकामी सुपुर्त करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| **मा.पिठासीन प्राधिकारी तथा अति.आयुक्त, महानगरपालिका, पुणे.** - | पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सभापती, शहर सुधारणा समिती पदाकरीता एक नामनिर्देशनपत्र मुदतीत दाखल झाले आहे. त्यामध्ये उमेदवार त्यांचे सुचक, अनुमोदक यांची नावे पुढील प्रमाणे आहेत. |

| अ.क्र. | उमेदवाराचे नांव | सुचकाचे नांव | अनुमोदकाचे नांव |
|---|---|---|---|
| ०१ | मा.लांडगे राजेंद्र किसनराव | मा.सुनिता हेमंत तापकीर | मा.कैलास ऊर्फ बाबा भालचंद्र बारणे |

मा.सभापती, शहर सुधारणा समिती या पदासाठी मुदतीत प्राप्त झालेल्या उपरोक्त एक नामनिर्देशन पत्राची छाननी करणेत आली असून सदर नामनिर्देशनपत्र परिपूर्ण आहे. त्यावर उमेदवाराचे नाव, पत्ता, प्रभाग क्रमांक नमुद आहे तसेच नामनिर्देशनपत्रावर उमेदवाराची स्वाक्षरी आहे. त्याचप्रमाणे नामनिर्देशनपत्रावर समितीच्या एका सदस्याने सुचक म्हणून स्वाक्षरी केली आहे आणि समितीच्या दुस-या सदस्याने अनुमोदक म्हणून स्वाक्षरी केली आहे. सबब सदरचे नामनिर्देशनपत्र वैध असून स्विकृत करण्यात येत आहे.

त्यामध्ये शहर सुधारणा समिती **सभापती** पदाची निवडणूक लढविणारे **मा.लांडगे राजेंद्र किसनराव** हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

- **नामनिर्देशनपत्र माघारी घेणे** -

उमेदवारास उमेदवारी अर्ज माघारी घेणेकामी सकाळी ११.३३ ते ११.३८ वा. पर्यंत वेळ देण्यात आली या वेळेत उमेदवाराने उमेदवारी अर्ज मागे घेतला नाही.

----------

**- उमेदवार निवडून आल्याची घोषणा –**

नामनिर्देशन पत्र माघारी घेणेबाबत विचारणा केली असता उमेदवाराने उमेदवारी मागे घेणार नसल्याचे सांगितले. सबब मा.सभापती, शहर सुधारणा समिती पदाची निवडणूक लढविणारे **मा.लांडगे राजेंद्र किसनराव** हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार आहेत.

यास्तव **मा.लांडगे राजेंद्र किसनराव** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शहर सुधारणा समितीचे **सभापती** पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे मी रुबल अग्रवाल, पिठासीन प्राधिकारी, तथा अतिरिक्त आयुक्त, महानगरपालिका, पुणे, शहर सुधारणा समिती (विशेष सभा) जाहीर करते.

----------

ठराव क्रमांक - १
दिनांक - १४/०६/२०१९

विषय क्रमांक - १
विभाग – नगरसचिव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.शहर सुधारणा समिती **सभापती** पदासाठी मुदतीत दाखल झालेल्या व वैध ठरलेल्या नामनिर्देशन पत्रामधील मा.शहर सुधारणा समिती **सभापती** पदाची निवडणूक लढविणारे **मा.लांडगे राजेंद्र किसनराव** हे एकच रितसर वैधपणे नामनिर्देशित उमेदवार असल्याने **मा.लांडगे राजेंद्र किसनराव** यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शहर सुधारणा समितीचे **सभापती** पदावर रितसर वैधरित्या बिनविरोध निवड झाल्याचे जाहिर करणेत येत आहे.

**---------**

**सही/-**
**(रुबल अग्रवाल, भा.प्र.से.)**
पिठासीन प्राधिकारी तथा
अतिरिक्त आयुक्त, पुणे मनपा
शहर सुधारणा समिती (विशेष सभा)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/२७९/२०१९
दिनांक : १४/०६/२०१९



(उल्हास बबनराव जगताप)
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.